दै. देशोन्नती दि. 23/02/2025

# वजिराबाद पोलिसांच्या कारवाईत पिस्तूल व तीन जिवंत काडतूससह एकजण ताब्यात

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** वजिराबाद पोलिसांनी केलेल्या कारवाईत एका आरोपीकडून पिस्तूल व जिवंत काडतूस जप्त करून अटक केली आहे.

वजिराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या आदेशान्वये वजिराबाद पोलिस ठाण्याच्या हद्दीत २१ फेब्रुवारी रोजी डि.बी. पथकाचे अंमलदार पेट्रोलींग करीत असतांना आंध्रा समीती शाळेच्या पाठीमागे गुरुद्वाराचे बंदस्थितीत असलेले हॉटेलच्या



मोकळया जागेत एक इसम गावठी पिस्तुल घेऊन वावरत असल्याची माहिती मिळाल्याने सायंकाळी ६.२५ वाजताच्या सुमारास सदर ठिकाणी गेले असता एक शिख धर्माचा इसम मिळुन आला असता त्यास छापा मारुन ताब्यात घेऊन त्याचे नाव- गाव विचारले असता त्याने त्याचे नाव राजुसिंघ ऊर्फ राजु हरजितसिंघ जाधव (३३) रा. हनुमान मंदीर पाठीमागे गोविंदनगर हिंगोली नाका असे सांगीतले. पोलिसांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेस एक गावठी पिस्तुल व त्याच्या नाईटपँटच्या खिशात तीन जिवंत काडतुस असा एकूण ३० हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळुन आला असून पोलिसांनी तो जप्त केला आहे. याप्रकरणी पोउपनि सुनिल बुलंगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोउपनि वशीष्ट बिकड हे करत आहेत.

दै. प्रजावाणी

# युवकाकडून पिस्तूलसह तीन जिवंत काडतुस जप्त



**नांदेड (प्रतिनिधी) –** शहराच्या वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे शोध पथकाने २१ फ ब्रुवारीच्या रात्री आंध्रा समिती शाळेच्या परिसरातून एका युवकास अटक केली. त्याच्याकडून एक पिस्तूल आणि तीन जिवंत काडतुस जप्त करण्यात आले आहे.

पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून वजिराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी आपल्या गुन्हे शोध पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू वटाणे, परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक सुनील बुलंगे आणि बिक्कड यांना गस्त घालण्याची सूचना केली. या पथकाने आंध्रा समिती शाळेच्या परिसरातून राजूसिंग उर्फ राजू हारजीतसिंग जाधव (वय ३३, रा. हनुमान मंदिर पाठीमागे गोविंदनगर हिंगोली नाका नांदेड) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक पिस्तूल आणि तीन जिवंत काडतुस जप्त करण्यात आले.

परीविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक सुनील बुलंगे यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक आणि पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी पथकाचे कौतुक केले.